


**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,(डाएट), कोल्हापूर
बी.टी.कॉलेज परिसर,
शाहूपुरी .
**दूरध्वनी क्रमांक ०२३१/२५३१८३१** **ई-मेल:** diecpdkolhapur@maa.ac.in , dietkop@gmail.com

जा क्र. जिशिप्रसको/क्रीडा स्पर्धा /२०२५-२६/१२९४ दि.२९ /१०/२०२५.

## सुधारीत पत्र

प्रति,

१. मा .प्राचार्य ,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व )
२ . शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद (सर्व )
३ .शिक्षणाधिकारी माध्यमिक , जिल्हा परिषद (सर्व )
३. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व )
४. प्रशासनाधिकारी (सर्व )

**विषय -शिक्षक व अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजनाबाबत....**

संदर्भ - १. मा.संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र जा.क्र.साव्यावि/राशैसंप्रप/शिक्षक स्पर्धा /२०२५ -२६ /१/१४९०२७३/२०२५ दि.१०/१०/२०२५
२. मा.संचालक यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ऑनलाईन बैठक दि.१४/१० /२०२५.
३. मा.सहसंचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे पत्र जा.क्र.साव्यावि/राशैसंप्रप/शिक्षक स्पर्धा /२०२५ -२६,दि.१७ /१०/२०२५
४.मा.संचालक यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ऑनलाईन बैठक दि.२८ /१० /२०२५.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा या ४२ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियम याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५-२६ वर्षापासून एकूण ४२ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे.याबाबत संबधित DIET कडून मार्गदर्शक सूचनापत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुका स्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. वरील ४२ स्पर्धांपैकी क्रीडा स्पर्धेचे विभागस्तरीय व राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांचेकडे देण्यात आलेली आहे.

## तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा प्रकार व अंदाजित खर्च
## (प्रत्येक तालुक्यातून जास्तीत जास्त २५ केंद्रे गृहीत धरून)

| अ. क्र | तपशील क्रिडा प्रकार | सहभाग संघ सांघिक व वैयक्तिक | स्त्री | पुरुष | पंच संख्या एका वेळी दोन सामने | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्त्री | पुरुष | एकूण |
| १. | खो खो<br>२५ संघ x ९ | २२५ | ५० % | ५० % | ०३ | ०३ | ०६ |
| २. | व्हालीबॉल<br>२५ संघ x ६ | १५० | ५० % | ५० % | ०३ | ०३ | ०६ |
| ३ | बडमिटन(२५ x १) | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| ४ | लांबउडी | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| ५ | थाळीफेक | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| ६ | गोळाफेक | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| ७ | भालाफेक | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| ८ | धावणे (१०० मी.) | वैयक्तिक | २५ | २५ | ०३ | ०३ | ०६ |
| | | ३७५ | १५० | १५० | - | - | ४८ |

- **सहभागी स्पर्धक संख्या -**

२५ केंद्र असतील तर स्पर्धक ६७५ + पंच ४८+ लेखनिक /officials १६ (प्रत्येक प्रकारासाठी - )

- केंद्र संख्या २५ पेक्षा कमी असेल तर त्यानुसार सहभागी संख्या कमी असेल. त्याप्रमाणे नियोजन प्रत्येक जिल्ह्याने करावे.
- **स्पर्धेसाठी आवश्यक खर्चाचे निकष -**

१. मैदान आखणे (चॉकपीठ इ .) - १००० रु.
२. पंचांचे मानधन - प्रति व्यक्ती प्रति दिन ५०० रु.प्रमाणे
३. एक वेळ चहा व बिस्कीट - प्रति व्यक्ती १५ रु.प्रमाणे

**विशेष सूचना** - अ) प्रथमोपचार पेटी तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडून उपलब्ध करून घ्यावी. तसेच स्पर्धेच्या दिवशी त्यांची टीम उपस्थित राहणेसाठी पत्र द्यावे .
ब ) स्पर्धेसाठी लागणारी स्टेशनरी (एक रिम कागद ) कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावे.
क) क्रिडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धक व पंच यांनी स्वतः चा जेवणाचा डबा सोबत आणणेबाबत सूचना द्यावी .
ड ) खो खो या खेळासाठी ९ - ९ मिनिटांचा एकच डाव होईल .
ई ) व्हालीबॉल व बडमिटन साठी १५ पाइंटचा एकच सेट खेळविला जाईल .
फ ) तालुका क्रिडा स्पर्धेसाठी मैदान, क्रिडा साहित्य व पंच उपलब्ध करून घेणेसाठी मा.जिल्हा क्रिडा अधिकारी व तालुका क्रिडा अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात यावे.
ग ) क्रिडा स्पर्धा नोंदणीची लिंक SCERT कडून सर्व स्पर्धांची एकत्रित लिंक दिले आहे त्याचा वापर करावा .
**स्पर्धेचे स्तर** - स्पर्धा ३ स्तरात होईल .
१. तालुका स्तर - प्रत्येक केंद्रातून एक स्पर्धक तालुकास्तरावर सहभागी होईल .
२. विभाग स्तर - तालुकास्तरावरील विजेते विभागस्तरावर सहभागी होतील. सांघिक स्पर्धेमध्ये प्रत्येक जिल्ह्यातील एक टीम विभाग स्तरावर सहभागी होईल .
३. राज्यस्तर - विभाग्स्तारावरील विजेते राज्य पातळीवर सहभागी होतील.
ह ) तालुकास्तर, विभागस्तर व राज्यस्तर सन्मानपत्र व पारितोषिक मा. संचालक SCERT पुणे यांच्या आदेशानुसार जाहीर करणेत येईल.

**क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना -**

१. वैयक्तिक क्रीडा स्पर्धा - वैयक्तिक क्रीडा स्पर्धा या तालुकास्तर, विभाग स्तर व राज्यस्तर याप्रमाणे होतील.

२. सांघिक क्रीडा स्पर्धा- सांघिक क्रीडा स्पर्धा या तालुकास्तर, विभाग स्तर व राज्यस्तर याप्रमाणे होतील

संदर्भ क्र.५ च्या पत्रानुसार नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी म्हणजेच ७ नोव्हेंबर रोजी प्रत्येक तालुकास्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा /राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची/ शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.

६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८. वैयक्तिक तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९. सांघिक स्पर्धा तालुकास्तरावर झाले नंतर प्रत्येक केंद्र/ तालुक्यातून उत्कृष्ट खेळणारे निवडक खेळाडू घेऊन जिल्ह्यासाठी एक टीम बनवावी. त्यामध्ये ५० टक्के पुरुष व ५० टक्के महिला असावेत. ही अट न पाळणारे संघ तालुका/ विभागीय स्पर्धेसाठी अपात्र राहील.

१०. प्रत्येक क्रिडा प्रकारामध्ये पंचांचा निर्णय अंतिम राहील.

११. एखादा खेळाडू अथवा संघाने गैरवर्तन किंवा अशोभनीय वर्तन केल्यास तो खेळाडू / संघ स्पर्धेतून तात्काळ अपात्र/ बाद ठरविला जाईल.

१२. तालुकास्तर क्रिडा स्पर्धा निकाल प्रपत्र खाली दिलेल्या नमुन्यामध्ये EXcel sheet मध्ये विभागीय स्पर्धेसाठी पाठविण्यात यावे.

**तालुकास्तर क्रिडा स्पर्धा निकाल प्रपत्र**

**तालुका ------------- जिल्हा ----------------**

| अ. क्र. | क्रिडा प्रकार | विजेता क्रमांक | शिक्षकाचे नाव | शालार्थ आयडी | शाळा | केंद्र | मोबाईल नं . | नोंदविलेला वेळ/ अंतर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खो खो | | | | | | | | |
| २ | व्हालीबॉल | | | | | | | | |
| ३ | धावणे | | | | | | | | |
| ४ | गोळाफेक | | | | | | | | |
| ५ | थाळीफेक | | | | | | | | |
| ६ | भालाफेक | | | | | | | | |
| ७ | लांबउडी | | | | | | | | |
| ८ | बडमिटन | | | | | | | | |

विभाग स्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनासाठी जिल्हास्तर समिती-

| अ क्र | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | अध्यक्ष |
| २. | जिल्हा क्रीडा अधिकारी | सहअध्यक्ष |
| ३. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. | सदस्य |
| ४. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. | सदस्य |
| ५. | जिल्हा आरोग्य अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | जिल्हा माहिती अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ७. | स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रशासनाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| १० | वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता, DIET | सदस्य |
| ११ | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, DIET | सदस्य सचिव |

<u>तालुकास्तर क्रीडा स्पर्धा व अन्य स्पर्धा आयोजन समिती-</u>

| अ क्र | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | गटशिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी | समन्वयक |
| २. | तालुका क्रीडा समन्वयक | सह समन्वयक |
| ३. | तालुका संपर्क अधिकारी(DIET) | सदस्य |
| ४. | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ५ | स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | केंद्रप्रमुख प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | विषय साधन व्यक्ती प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | तालुका विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

(श्रीम.तेजस्विनी आळवेकर)
वरिष्ठ अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
कोल्हापर

(श्रीम.वैशाली पाटील)
वरिष्ठ अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
कोल्हापूर

(डॉ.रमेश होसकोटी)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

१. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे
२ . मा.जिल्हा क्रिडा अधिकारी सर्व ,जिल्हा क्रिडा विभाग
३ तालुका क्रिडा अधिकारी सर्व, तालुका क्रिडा विभाग
४. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व )जिल्हा आरोग्य विभाग